॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

मेस चालविणेसाठी निविदा सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील मुलांचे वसतिगृह क्र. १, २, ३ तसेच मुलींचे वसतिगृह क्र. १ व २, ३ तसेच बाबू जगजीवनराम / अल्पसंख्याक / डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम मुलींचे वसतिगृह असे एकूण आठ वसतिगृहासाठी दि.०१ ऑगस्ट, २०२२ ते ३० जुन, २०२३ या कालावधीकरीता करार पध्दतीने मेस चालविण्यासाठी नोंदणीकृत मेस ठेकेदांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

दि.१८/०७/२०२२ पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच अधिक महिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.कोणत्याही मेस निविदा स्विकारण्याचा / फेटाळण्याचा अधिकार वसतिगृह व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. सदर निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबधीची सूचना फक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.(संपर्क : ०२५७-२२५७४८२)

दिनांक : २५/०६/२०२२ (प्रा. किशोर फ.पवार)

ठिकाण : जळगाव प्रभारी कुलसचिव

निविदा किंमत : रू. २०००/-

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

करार पध्दतीने

वसतिगृह मेस

चालविण्यासाठी निविदा

जून

२०२२

: निवास क्षमता :

A) मुलांचे वसतिगृह क्र.१ - १४२ विद्यार्थी
B) मुलांचे वसतिगृह क्र.२ - १९७ विद्यार्थी
C) मुलांचे वसतिगृह क्र.३ - २२२ विद्यार्थी
D) मुलींचे वसतिगृह क्र. १ + २ - १४४ विद्यार्थीनी
E) मुलींचे वसतिगृह क्र. ३ - १७३ विद्यार्थीनी
F) बाबु जगजिवनराम मुलींचे वसतिगृह - २०० विद्यार्थीनी
G) अल्प संख्याक मुलींचे वसतिगृह - १०० विद्यार्थीनी
H) डॉ.ऐ पी जे अब्दुल कलाम मुलींचे वसतिगृह - २०५ विद्यार्थीनी

करार पध्दतीने वसतिगृह मेस चालविण्यासाठी निविदा

१) निविदा प्रसिध्दीची तारीख - दि.२७. ०६ .२०२२

२) सिलबंद निविदा स्वीकारण्याची अखेरची तारीख व वेळ - दि.१८.०७.२०२२ दुपारी ४.०० वाजेपर्यंत

३) सिलबंद निविदा उघडण्याची तारीख व वेळ - दि. १९.०७.२०२२ दुपारी ३.०० वाजता

४) ठिकाण - कक्ष क्र.४३२, प्रशासकीय इमारत, कबचौउमवि, जळगाव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रति,
मा.प्र.कुलसचिव,
क ब चौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

निविदा धारकाचे छायाचित्र

महोदय,

आपण दिलेली दिनांक / /२०२२ च्या दैनिक _____मधील "मेसनिविदा" वाचली. त्यानुसार मी आपल्या विद्यापीठ परिसरात असलेले **मुलांचे वसतिगृह क्र.१ / २ / ३ तसेच मुलींचे वसतिगृह क्र.(१+२) / क्र.३ / बाबु जगजिवनराम मुलींचे वसतिगृह / अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह / डॉ.ऐ पी जे अब्दुल कलाम मुलींचे वसतिगृह** ची मेस चालवू इच्छित आहे. वरील बाबतीत आवश्यक असणारी सर्व माहिती खालीलप्रमाणे :

१) निविदाधारकाचे/संस्थेचे संपुर्ण नाव : _____

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : _____

(दूरध्वनी क्रमांकासहीत) _____

३) मुबंई दुकान व संस्था अधिनियम १९४८ परवाना क्रमांक व कालावधी
:_____

४) पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र पडताळणी दाखला जोडले आहे का : होय / नाही.

५) निविदा फॉर्म किंमत अदा केल्याचा : _____

पावती क्रमांक व दिनांक : _____

६) अनामत रक्कमेचा डी.डी. क्रमांक, : _____

बँकेचे नाव, रक्कम व दिनांक _____

७) यापूर्वीच्या मेस/खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? : _____

८) आधार कार्ड नंबर : _____

९) रहिवास दाखला : _____

१०) अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत अन्न परवाना/नोंदणी : _____

(टिप :- वरील सर्व दाखल्यांच्या छायाकिंत प्रती जोडा)

मी, आपल्या मेसनिविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्या मला मंजूर आहेत. मी विद्यापीठाच्या मेससाठी दोन्ही वेळच्या भोजनाचे एकूण बील (सर्व देय करांसहीत) प्रतिमाह प्रतिविद्यार्थी रु. _____ (अक्षरी रुपये _____) प्रमाणे आकारण्यासाठी प्रस्तावीत आहे. तरी मला सेवेची संधी द्यावी ही नम्र विनंती.

निविदाधारकांची सही व नाव

मेसच्या अटी व शर्ती

टिप :- मेस निविदेसोबत पोलीस अधिक्षक यांचेकडील चारीत्र्य पडताळणी दाखला सोबत जोडणे आवश्यक राहील.

१) मेसनिविदा फॉर्म विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेसोबत रुपये २०००/- (अक्षरी दोन हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट **"वित्त व लेखाअधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव"** या नावाने सादर करणे आवश्यक आहे.**परिपूर्ण भरलेली निविदा मुलांचे वसतिगृह क्र. ३ येथे जमा करावी.**

२) मेसनिविदा सोबत सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या मेस परवानाची साक्षांकीत केलेली सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे, तसेच **मेस बयाना रक्कम** म्हणुन रुपये **५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र)** चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट **"वित्त व लेखा अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव"** यांच्या नावे मेसनिविदे सोबत जोडावा. ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत होणार नाही त्या निविदा धारकास बयाना रक्कमेचा तोच डिमांड ड्राफ्ट परत केला जाईल.

तसेच जे निविदा धारक मेस ठेका देण्यास पात्र होतील त्या निविदा धारकास खालील तक्त्याप्रमाणे मेस निहाय सुरक्षा अनामत रक्कम **"वित्त व लेखा अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव"** यांचे नांवे काढलेला डिमांड ड्राफ्ट ने मेस आदेश स्विकृत करणेपूर्वी विद्यापीठात द्यावी लागेल.

मेस सुरक्षा अनामत रक्कम खालील प्रमाणे मेस सुरु होण्यापूवी भरावी लागेल.

अ.क्र.	मेस चे नाव	मेस सुरक्षा अनामत रक्कम	पात्र निविदा धारकांनी बयाना रक्कम वजावट करुन भरावयाची मेस सुरक्षा अनामत रक्कम
०१	मुलांचे वसतिगृह क्र.१	९०,०००/-	४०,०००/-
०२	मुलांचे वसतिगृह क्र.२	१,२०,०००/-	७०,०००/-
०३	मुलांचे वसतिगृह क्र.३	१,३५,०००/-	८५,०००/-
०४	मुलींचे वसतिगृह क्र. १ + २	९०,०००/-	४०,०००/-
०५	मुलींचे वसतिगृह क्र. ३	१,१०,०००/-	६०,०००/-
०६	बाबु जगजिवनराम मुलींचे वसतिगृह	१,२०,०००/-	७०,०००/-
०७	अल्प संख्याक मुलींचे वसतिगृह	६०,०००/-	१०,०००/-
०८	डॉ.ऐ पी जे अब्दुल कलाम मुलींचे वसतिगृह	१,१०,०००/-	६०,०००/-

मेस सुरक्षा अनामत रक्कम मेस कराराचा कालावधी संपल्यानंतर वसतिगृह कार्यालयातुन ना-हरकत प्रमाणपत्र घेवून परत दिली जाईल. भरलेल्या मेस सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

३) ठेकेदाराने भरलेली मेसनिविदा विद्यापीठाने स्विकारल्यास त्याबाबत ठेकेदारास पत्रान्वये कळविण्यात येईल, तसेच कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेला आहे.

४) विद्यापीठाचे कर्मचारी / अधिकारी व प्राधिकरणांच्या कोणत्याही सदस्यास व त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाही.

५) वसतिगृह मेसला व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच विद्यापीठातील इतर अधिकारी केव्हाही भेट देतील व मेस मधील खाद्य पदार्थांची प्रतवारी तपासतील. खाद्य पदार्थांची प्रतवारी चांगल्या प्रतीची नसल्यास किंवा कमी दर्जाची असल्यास मेस कंत्राट रद्द करण्याचा किंवा दंडात्मक कारवाई करण्याचा सर्व अधिकार वसतिगृह व्यवस्थापन समितीस राहील.

६) ठेकेदारास **ऑगस्ट २०२२ ते जुलै २०२३** या कालावधीसाठीच मेस चालविण्यास मिळेल. परंतु ठेकेदाराची सेवा विद्यापीठाच्या मते समाधनकारक वाटल्यास अधिकच्या दोन कालावधीसाठी ठेका वाढवून देण्यात येईल.पुढील मेस ठेका वाढवुन देतांना मेस दर वाढविणे बाबतचा अधिकार विद्यापीठाने आपल्याकडे राखून ठेवलेला आहे.

७) ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत केली जाईल त्यांना **वसतिगृह व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या** रोजी मेस सुरु करणे बंधनकारक राहील. त्यांनी जर मेस चालविण्यास असमर्थता दर्शाविली, तर त्यांची संपुर्ण मेस बयाना रक्कम रु. **५०,०००/-(रु. अक्षरी. पन्नास हजार रुपये मात्र**) जप्त करण्यात येईल. व मेस ठेका पुढील ठेकेदारास वाटाघाटी करुन देण्यात येईल.

८) निविदा स्विकृत केलेल्या ठेकेदारास मेसच्या अटी व शर्तीचा करारनामा रुपये **१००/- (रुपये शंभर मात्र)** च्या कोर्ट फी स्टॅम्पवर मेस सुरु होण्यापूर्वी नोंदणीकृत नोटरी करुन द्यावी लागेल.

९) ठेकेदाराला काही कारणास्तव नेमून दिलेल्या करार कालावधीच्या आत मेस रद्द अथवा बंद करावयाची असल्यास त्यासंबंधी ठेका रद्द करण्याच्या तारखेपूर्वी **४५ (पंच्चेचाळीस)** दिवस अगोदर लेखीपत्राद्वारे सबळ कारणासह मा.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना कळविणे आवश्यक राहील. तसे न केल्यास मेस अटी व शर्तीनुसार त्यांची संपूर्ण मेस सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) एका निविदाधारकास एक मेस ठेका देण्यात येईल.तसेच कोणता मेस ठेका कोणत्या निविदा धारकास द्यावा याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील. मेस मध्ये जेवणाच्या वेळेस ठेकेदारास किंवा रक्ताच्या नात्यातील जबाबदार व्यक्तीस उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

११) मेसचा ठेका दुसऱ्यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट-ठेकेदार नेमता येणार नाही. तसे आढळल्यास विद्यापीठ नियमानुसार कायदेशीर कारवाई करुन **मेस सुरक्षा अनामत** रक्कम जप्त करण्यात येईल.

१२) मेस मधील खाद्य पदार्थांची प्रत तपासण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१३) विद्यापीठामार्फत मेस मध्ये भोजनकक्ष, स्वयंपाकगृह व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या बाबींचे मेस ठेका कालावधीत रु.३०,०००/- (अक्षरी रु. तिस हजार मात्र) भाडे मेस सुरु होण्यापूर्वी भरावे लागेल.

१४) मेस मध्ये वीज वापरासाठी विद्यापीठाकडून विद्यूत मीटर बसवून देण्यात आले आहे. त्यांच्या मासिक आकारणीनूसार देय रक्कम ठेकेदाराकडून घेण्यात येईल. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार वीज वापराचे बिल दरमहा भरावे लागेल. मेस ठेकेदरांकडे विज बील थकल्यास दंडासह रक्कम वसूल करण्यात येईल.

१५) वसतिगृहात निवासास असणाऱ्या मुला-मुलींना वसतिगृहातील मेसमध्ये जेवण घेणे अपेक्षीत आहे. आपल्या मेस मध्ये जेवढे विद्यार्थी मेस लावण्यास इच्छुक असतील त्या मुला-मुलीं साठी टेंडर कालावधीसाठी मेस चालविणे बंधनकारक राहील.

१६) शैक्षणिक सहल व फिल्ड वर्क साठी विद्यार्थी जात असेल आणि विद्यार्थ्यांने मेस ठेकेदारास लेखी पूर्व सुचना दिल्यास त्या विद्यार्थ्याचे मेस खाडे ग्राह्य धरण्यात येतील. तसेच हिवाळी व उन्हाळी सुटीच्या कालावधीत मेस खाडे ग्राह्य धरण्यात येतील.

१७) दैनंदीन भोजनात खालील पदार्थांचा समावेश असेंल - त्यात विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या हितानूसार व मा.रेक्टरांच्या संमतीनुसार वेळोवेळी योग्य तो बदल करण्यात येईल.

मेस मेनू

सकाळ जेवण वेळ, **सकाळी ११.३० ते ३.०० वाजेपर्यत**	१) गव्हाच्या पोळया (चपात्या)
	२) भात
	३) वरण
	४) कोरडी भाजी
	५) पातळ भाजी/उसळ
	६) कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध कमितकमी त्यापैकी दोन सलाद द्यावे.
	७) चटणी/लोणचे (मर्यादीत) ८) दही/ताक आवश्यकतेनुसार साखर (मर्यादीत)

संध्याकाळी जेवणाची वेळ, **०७.०० ते १०.०० वाजेपर्यत**	१) गव्हाच्या पोळया (चपात्या)
	२) भात
	३) वरण
	४) कोरडी भाजी/पातळ भाजी
	५) कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध कमितकमी त्यापैकी दोन सलाद द्यावे
	६) चटणी/लोणचे (मर्यादीत)

प्रत्येक १५ दिवसाच्या रविवारी दुपारी फिस्ट पूढीलप्रमाणे :- एका मेससाठी १ ला आणि ३ रा रविवार दुसऱ्या मेससाठी २ रा व ४ था रविवार **(फिस्टच्या दिवशी संध्याकाळी कढी व खिचडी द्यावी)** स्वातंत्र दिन,प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिव जंयती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती या दिवशी फिस्ट द्यावी लागेल. फिस्टच्या दिवशी जेवणाची वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यत	१) पनिर भाजी **/ मसाले भाजी**
	२) बटाटा भाजी / उसळ
	३) पुलाव किंवा मसाले भात
	४) चपाती / पुरी / पराठा
	५) भजी
	६) पापड (मर्यादीत)
	७) लोणचे व कोशिंबीर मर्यादीत
	८) कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध कमितकमी त्यापैकी दोन सलाद द्यावे
	९) गोड पदार्थ (मर्यादीत)

टिप :- उपरोक्त मेनू प्रमाणे जेवण व जेवणात समाविष्ट केलेले पदार्थ न दिल्याचे आढळल्यास संबंधित मेस ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
मेस ठेकेदाराने सर्व वस्तु उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात.

१८) मेस मधील कोणत्याही साहित्याची नासधूस, मोडतोड, चोरी, अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसान मेस ठेकेदाराला भरुन द्यावे लागेल.

१९) मेस सुरु झाल्याच्या पहिल्या दिवसापासूनच भांडी, पाणी, खाद्यपदार्थ तसेच स्वयंपाकगृह, भोजनकक्ष, व टेबल याबाबत स्वच्छता असणे, नोकरांचे कपडे विशिष्ट गणवेशात स्वच्छ व निटनेटके असणे आवश्यक आहे, तसेच बाल कामगार कायद्याचे पालन करुन, १८ वर्षे वयाच्या आतील व्यक्तीस नोकर म्हणून कामावर ठेवू नये. त्याचप्रमाणे यासंदर्भातील कोणत्याही कायद्याचे उल्लंघन ठेकेदाराने करु नये. तसे केल्यास विद्यापीठ व विद्यापीठाचे कोणतेही अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी मेस ठेकेदाराची राहील. त्याचप्रमाणे नोकरांची वैद्यकीय तपासणी दर तीन महिन्यांनी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून करुन घेणे बंधनकारक राहील. नोकरांचे वैद्यकीय तपासणी केल्याचे प्रमाणपत्र वसतिगृह अधिक्षक / वसतिगृह अधिक्षीका यांना सादर करावे. तसेच नोकरांचा विमा असावा. मेस मध्ये ठेकेदाराची आणि मेस मधील इतर नोकरवर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपुर्ण असली पाहीजे. ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तसेच ठेक्या बाबत संपूर्ण कामगार कायदे, स्थायी आदेश यांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील. त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी दरमहा किमान एकदा संबंधित वसतिगृह कार्यालयात दाखविणे आवश्यक राहील.

२०) मेस मध्ये काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही मेस ठेकेदाराची राहील.

२१) मेस मध्ये धूम्रपान, गुटखा, तंबाखुयुक्त पदार्थ, तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादींची विक्री किंवा सेवन करता येणार नाही.

२२) विद्यार्थ्यांशिवाय इतर कोणालाही मेस मध्ये जेवण देण्यास बंदी राहील. परंतू विद्यार्थ्यांचे पालक / पाहुणे/ विद्यापीठ कर्मचारी यांना गेस्ट चार्ज आकारुन मेसमध्ये जेवण देता येईल. तसेच विद्यापीठातील कार्यक्रम किंवा सभेला जेवण लागल्यास मा.कुलसचिवांच्या पूर्वपरवानगीने देता येईल. या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाला वा व्यक्तीला मेसमधील जेवण देण्यास प्रतिबंध राहील.

२३) मेस ठेकेदारांनी विद्यार्थ्यांकडील मेस बील स्वत: वसूल करावे व त्याची रितसर बीलाची पावती वेळोवेळी संबंधितांना द्यावी. **विद्यार्थ्यांकडून मेस ची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी मेस ठेकेदाराची राहिल.**

२४) विद्यार्थ्याची मागणी असल्यास मेस ठेकेदाराने सकाळी नास्ता देणे बंधनकारक राहील. त्याकरीता खाद्य पदार्थांचे दर वसतिगृह व्यवस्थापन समितीने ठरवून दिल्या प्रमाणे राहतील.

२५) मेस ठेकेदारानी विद्यार्थ्याशी वादविवाद न करता विद्यार्थ्याबाबत तक्रार असल्यास वसतिगृह कार्यालयात त्वरीत संपर्क करावा.

२६) मेस मध्ये जेवण करीत असतांना जर मुलांच्या व मुलींच्या ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे, अळी, झुरळ इ. निघाले तर त्यांनी त्वरीत वसतिगृह अधिक्षक /वसतिगृह अधिक्षीका किंवा त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी यांना दाखवावे चौकशी केल्यांनतर त्यांनी त्वरीत रेक्टर यांना अहवाल सादर करावा. नंतर रेक्टर हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे, अन्न व औषध विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. ठेकेदाराने पूरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास व सिध्द झाल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील व मेस ठेका रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२७) वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्या संदर्भात मेस ठेकेदाराचे म्हणणे ऐकून घेवून सदर ठेका रद्द करण्याचा सर्व अधिकार मा.वसतिगृह व्यवस्थापन समितीस राहील. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठास राहील आणि तो निर्णय मेस निविदा धारकास बंधनकारक राहील.

२८) मेस मध्ये एका वेळेस उपयोगात येणा-या प्लॅस्टीकचा (Single Use Plastic) वापर करु नये.तसेच प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी तसे न केल्याचे आढळल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२९) मेस मधील उरलेले अन्न,खरकटे आणि सांडपाणी इतर अनावश्यक वाया जाणारे पदार्थाची विद्यापीठ परिसराबाहेर नेवून विल्हेवाट लावणे मेस ठेकेदारास बंधनकारक राहील.

३०) मेस व मेसचा आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मेस ठेकेदाराची राहील.

३१) विद्यापीठाने मेस व्यवस्थापनाचे ऐन वेळेस घेतलेले निर्णय मेस धारकास बंधनकारक राहतील.

३२) मेस ठेक्यासंदर्भात काही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याचे कार्यकक्ष हे मे.न्यायालय जळगाव हे राहील.

प्र.कुलसचिव

वरील सर्व अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचून व समजून घेतल्या असून त्यांचे मी तंतोतंत पालन करीन.

स्थळ :

दिनांक : / / २०२२ **ठेकेदाराचे नाव व सही**

हमीपत्र

दि. / /२०२२

श्री._____ यांचा खानावळ चालविण्याचा परवाना (मेस-परमीट) क्र._____हा असुन त्यांना मी स्वतः गेल्या _____ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांनी खानावळ चालवितांना चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

आपला विश्वासु

(_____)

ओळख देणाराचे नाव,पत्ता
दुरध्वनी क्रमांक

हमीपत्र

दि. / /२०२२

श्री._____ यांचा खानावळ चालविण्याचा परवाना (मेस-परमीट) क्र._____हा असुन त्यांना मी स्वत: गेल्या _____ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांनी खानावळ चालवितांना चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

आपला विश्वासु

(_____)

ओळख देणाराचे नाव,पत्ता
दुरध्वनी क्रमांक